Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidiciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

IMPACT FACTOR : 0.2105

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [Malaysia]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore
University of Management Sciences [PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

नव्या आर्थिक धोरणाचे ग्रामीण क्षेत्रावरील परिणाम

भारत एम. राठोड , शिवप्रसाद सदानंद जायस्वाल

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अर्जुनी/मोर., जि. गोंदिया.

सारांश :

नव्या आर्थिक धोरणामधील सुधारणांमधून आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याबरोबरच विकासाचा उच्चदर, रोजगार निर्मितीचा विस्तार, दारिद्र्या रेशेखाली असलेल्या लोकांच्या संख्येत घट, आर्थिक विषमता कमी करून गरीब व दुर्बल घटकांना लाभ प्राप्त करून देणे, भारतातील संपन्न व गरीब राज्यामधील अंतर कमी करणे ही उद्दिष्टे नव्या आर्थिक धोरणामुळे साध्य झाल्याचे दिसून येत नाही. याउलट दिवसेंदिवस आर्थिक व सामाजिक विषमतेची दरी या धोरणामुळे निर्माण झाल्याचे चित्र पुढे येऊ लागले आहे. मागील पंधरा–विस वर्शाच्या वाटचालीत जागतिकीकरणाच्या नावाखाली जे आर्थिक धोरणे आपण बदलविली किंवा आपल्याला बदलावी लागली त्याचा परिणाम भारताच्या व्यापार, उद्योगासोबतच इथल्या अर्थव्यवस्थेवर मोठ्याा प्रमाणात होऊन बाहेरील देशातून भारतात उद्योगधंदे येण्याची जी स्पर्धा वाढली आहे, बाजारपेठा खुल्या झाल्या आहेत, त्याचा परिणाम भारताच्या लघु आणि कुटीर उद्योगाबरोबरच मध्यम उद्योगांवरदेखील मोठ्याा प्रमाणात झाल्याचे दिसून येत आहे.

नवीन आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्यामुळे मोठमोठ्याा व्यापारी कंपन्यानी आपले पाय मजबूत करण्याचा प्रयत्न केल्यामुळे भारतातील लघु उद्योग आपले रक्षण करू शकत नाही. तंत्रज्ञानावर अत्याधिक भर दिल्यामुळे ग्रामीण विभागातील युवकांच्या बेरोजगारीत वाढ होत आहे. सरकारसुद्धा प्रत्येक क्षेत्रात कंत्राटी पद्धतीने काम करून घेत आहे; त्याचा परिणाम बेकारीत वाढ होत आहे. भारताने नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्यानंतर शेतमाल निर्यातीत फार मोठी वाढ होईल आणि शेतीला चांगले दिवस येतील असे भाकीत करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मात्र उलटच झाले. खुल्या आर्थिक धोरणामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारपेठेत उत्पादन खर्चाच्या आधारावर हमी भाव मिळत नसल्यामुळे विदर्भात प्रामुख्याने ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. आर्थिक व सामाजिक विशमतेची दरी दिवसेंदिवस वाढत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा नाश होऊन पर्यावरणात बदल येऊन ग्रामीण भारत उद्ध्वस्त होत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

प्रस्तावना :

भारताच्या नवीन आर्थिक धोरणांची किंवा सुधारणांची सुरूवात 1991 मध्ये देशावर आलेल्या संकटामुळे झालेली आहे; तसे पाहिले तर या नव्या आर्थिक धोरणाला श्री. राजीव गांधी पंतप्रधान असतांनाच सुरूवात झाली होती पण त्यांना यात अपेक्षित यश मिळाले नाही. त्यानंतर 21 जून 1991 रोजी श्री. नरसिंहराव पंतप्रधान झाल्यावर त्यांच्या राजवटीत; मा. डॉ. मनमोहनसिंग देशाचे अर्थमंत्री होते तेव्हा खऱ्याअर्थाने या नव्या आर्थिक धोरणाला सुरूवात झाली.

20व्या शतकाच्या अखेरच्या दशकात जागतिक स्तरावर अनेक परिवर्तने घडून आलीत. जसे जर्मनीचे एकीकरण, सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन त्याची भांडवलशाहीकडे झालेली वाटचाल, साम्यवादास बाजूला सारून चीन बरोबरच अनेक राष्ट्रांनी जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणास झुकते माप दिले. या दशकात जागतिक स्तरावर परकीय भांडवल, तंत्रज्ञान, विदेशी व्यापार तसेच आशिया खंडातील व आफ्रीका खंडातील अनेक राष्ट्रांनी खुल्या अर्थनितीचा अवलंब करून अल्पकाळात घडविलेला आर्थिक विकास यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत सुद्धा नवीन धोरणाबाबत विचार गतीमान होण्यास सुरूवात झाली.

भारत एक विकसनशील देश आहे. भारतातील 60 टक्के जनतेचा उदरनिर्वाह शेतीवर आधारित आहे; हे भारताचे प्रमुख वैशिष्ट्यो आहे. कोणत्याही देशाचा तिव्र गतीने आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकीकरणाच्या साहाय्याने केवळ उद्योगधंद्याचा विकास होऊ शकतो असे नाही तर शेती, व्यापार इ. क्षेत्राला सुद्धा प्रोत्साहन मिळते.

नवीन आर्थिक धोरणातून आर्थिक विकास होईल असे भाकीत केल्यामुळे सर्वप्रथम आर्थिक विकासाची संकल्पना स्पष्ट करणे क्रमप्राप्त ठरते.

आर्थिक विकासाच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण करताना दरडोई उत्पन्नामधील वाढ आणि नागरिकांच्या आर्थिक कल्याणात होणारी वाढ ह्याा दोन्ही निकशांचा उपयोग करण्याची पद्धती अलीकडे प्रचलित आहे; ह्याा दृष्टीकोनातून विचार केल्यास विकास ही अशी प्रक्रिया आहे; ज्यामुळे नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होते व त्याबरोबरच समाजातील आर्थिक विषमता कमी होते, नागरिकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते तसेच त्यांच्या जीवनदर्जामध्ये (Quality of Life) सुधारणा घडून येते. आर्थिक सुधारणांचा विचार होतांना गुंतवणुकीवर जास्त भर देऊन औद्योगिक प्रगतीवर लक्ष केंद्रित केले जाते. परंतु शैक्षणिक प्रगती, पाणी, आरोग्य, दारिद्र्या निर्मुलन, रोजगार निर्मिती, उर्जा विकास इत्यादी अत्यावश्यक बाबीकडे अपेक्षित लक्ष नसल्याने सर्वसामान्याच्या दृष्टीने अपेक्षित विकास होत नाही.

ओकून आणि रिचर्डसन यांच्या शब्दात, "आर्थिक विकास म्हणजे लोकांच्या भौतिक जीवनात सातत्याने घडून आलेली सुधारणा होय."

"Economic development is a sustained secular improvement in material well-being which we may consider to be reflected in an increasing flow of goods and services."1

विलियम्सन व बट्रिक या लेखकांच्या मते, "आर्थिक विकास किंवा वृद्धी म्हणजे अशी प्रक्रिया होय ज्यामुळे कोणत्याही देशातील किंवा प्रदेशातील लोकांना तेथे उपलब्ध असलेल्या संसाधनांचा उपयोग करून घेऊन वस्तू किंवा सेवांच्या दरडोई उत्पादनामध्ये निरंतर वाढ घडवून आणणे शक्य होते."

"Economic development or growth refers to the process, whereby the people of the country or region come to utilize the resource available to bring about a sustained increase in per capita production of goods and services."2

भारत सरकारने सन 1991 पासून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला आहे. नवे आर्थिक धोरण या नावाने तो सुपरिचित आहे ; म्हणजे 1991 पासून नव्या आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीला सुरूवात झाली. परकीय कर्ज, अंतर्गत कर्ज, वित्तीय तुट या आर्थिक अरिष्टांच्या विळख्यात सापडलेल्या अर्थव्यवस्थेला सुस्थिती प्राप्त करून देण्यासाठी कठोर आर्थिक कार्यक्रम राबविण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. हे लक्षात घेऊन भारतीय रिझर्व बँकेचे माजी गर्व्हनर व तत्कालीन अर्थमंत्री भारताचे विद्यमान पंतप्रधान मा. मनमोहनसिंग यांनी नवीन आर्थिक धोरणांची अंमलबजावणी करण्याचे ठरविले.

संशोधनाची उद्दिष्टे :

1.नवीन आर्थिक धोरणाचे स्वरूप स्पष्ट करणे.
2.नवीन आर्थिक धोरणांचा व्यापार उद्योगधंद्यावर झालेला परिणाम अभ्यासणे.
3.कृषीक्षेत्रावर झालेल्या अरिष्टांचा विचार करणे.
4.रोजगार निर्मितीवर झालेला परिणाम स्पष्ट करणे.
5.सामाजिक व आर्थिक विषमतेच्या दरीत झालेली वाढ तपासणे.
6.लघु व कुटीर उद्योगावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
7.उपाययोजना सूचविणे.

नव्या आर्थिक धोरणाचे स्वरूप :

''नाणेनिधी आणि जागतिक बँक यांच्या मार्गदर्शनानुसार भारत सरकारने अर्थकारणात स्थैर्य आणण्यासाठी, जमाखर्चात काही बदल करण्यासाठी आणि काही रचनात्मक सुधारणा करण्यास प्रारंभ केला. याचाच गाजावाजा नवीन आर्थिक धोरण असा करण्यात आला. वास्तविक यात नवीन काही नव्हते. 1980 साली दक्षिण अमेरिका व दक्षिण आफ्रीका खंडातील काही राष्ट्रे कर्जाच्या सापळ्यात सापडली होती. याही राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेने हीच उपाययोजना सांगितली होती.''[3]

भारताला कर्जे देणारी जी युरोपीय राष्ट्रे होती ती आपली धोरणे जागतिक बँकेच्या सूचनेनुसार ठरवित असत. 1981 पर्यंत त्यांनी सूचविलेली धोरणे मान्य केली की ती कर्जे देत. पण 1988 व 1989 साली त्यांनीही आपली कर्जे देणे बंद केले आणि कर्जाच्या बदलात भारताने आपली धोरणे बदलावित अशी मागणी केली. परकीय कर्जे मिळविण्याची शक्यता कमी होण्याचे कारण 1991 साली आंतरराष्ट्रीय क्षेत्रात झालेला बदल हे होय.[4]

भारताने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणात दोन प्रमुख कार्यक्रमांचा अंतर्भाव आहे. समग्र पातळीवरील आर्थिक स्थिरीकरण आणि संरचनात्मक समायोजन कार्यक्रम आर्थिक सुधारणांच्या या कार्यक्रमांचा आराखडा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या दोन वित्तीय संस्थानी तयार केला आहे. समग्र आर्थिक स्थिरीकरणाच्या कार्यक्रमात आयातीवरील निर्बंध उठविणे, वित्तीय तूट भरून काढणे, किंमती, विनियम आणि व्याजदरावरील नियंत्रणे काढून टाकणे, शासकीय अनुदानात कपात करणे अशा उपयांचा अंतर्भाव होतो.

संरचनात्मक समायोजन कार्यक्रमात उद्योगावरील शासकीय निर्बंध उठविणे, सार्वजनिक उद्योगाचे खाजगीरण घडवून आणणे, परकीय भांडवल आणि तंत्रज्ञानाला आपली दारे खुली करणे, परदेशी कंपन्या व उद्योगांना देशात प्रवेश देणे इत्यादी उपायांचा समावेश होतो. नव्या आर्थिक धोरणाचे उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण व बाजारीकरण हे चार पैलू आहेत. तत्कालीन अर्थमंत्र्यांनी उदारीकरणाचा पाया रचला. 1 जानेवारी 1995 पासून जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आली. भारतासह 135 देश यामध्ये सहभागी झाले. लहानमोठ्या सदस्य राष्ट्रांना समान संधीच्या तत्वावर व्यापाराची संधी मिळण्यासाठी ही संघटना निर्माण झाली. परंतु गेल्या पधरा–वीस वर्षात ठरल्याप्रमाणे काहीच घडले नाही. याउलट भारतासारख्या विकसनशील देशातील ग्रामीण क्षेत्रातील शेती, व्यापार व्यवसाय, तसेच सामान्य माणसावर त्याचे दुष्परिणाम झाल्याचे दिसून येत आहेत. नव्या आर्थिक धोरणाचे परिणाम केवळ देशातंर्गत अर्थव्यवस्थेपुरतेच मर्यादित राहणारे नसून राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रेही यथावकाश ढवळून निघाली आहेत.

नव्या आर्थिक धोरणाचे ग्रामीण क्षेत्रावरील परिणाम :

नवे आर्थिक धोरण राबविताना तत्कालीन अर्थमंत्र्यांनी चार आश्वासने दिली होती. जागतिकीकरणामुळे देशात परकीय गुंतवणूक होईल; त्यामुळे नवे उद्योग सुरू होतील त्यातून रोजगार निर्मिती होईल व नवे तंत्रज्ञान येऊन निर्यात वाढेल. गेल्या पंधरा–विस वर्षाच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एकूण आढावा घेतला तर देशाच्या विकासाचे जागतिकीकरणाच्या समर्थकांनी केलेले दावे पूर्णतः खोटे ठरले आहे. गॅट करार, पेटंट कायदा, मुक्त आयात–निर्यात धोरण, विदेशी उद्योजकांना प्रोत्साहन इत्यादी कायद्यांमुळे सामान्य माणसाबरोबरच शेती, पर्यावरण तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेतील पायाभूत व्यवसाय इ. क्षेत्रावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. त्यासंबंधी साधक बाधक चर्चा करणे आणि काही उपाय सूचविणे प्रस्तुत संशोधनात संशोधकाचा हेतू आहे.

नव्या आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून जागतिक उत्पादन आणि निर्यात यामध्ये वाढ झाली असली तरी ही वाढ प्रचंड प्रमाणात श्रीमंत राश्ट्रांचीच झाली आहे. एकूण उत्पादन वाढीत श्रीमंत राष्ट्रांचा वाटा 83 टक्के आणि निर्यातीमध्ये 81 टक्के होता. कमी उत्पन्न गटातील राष्ट्रांचे हेच प्रमाण अनुक्रमे 1.63 व 2.62 टक्के राहिले. उदारीकरणाचा परिणाम भारतासारख्या विकसनशील देशाच्या कृषी व्यवस्थेवर व ग्रामीण भागावर झाला, ज्यायोगे कृषी विकासाचा दर 3.7 प्रतिशतवरून 2.3 प्रतिशत पर्यंत खाली आला. एका बाजूने शेतीचा खर्च वाढलेला आहे आणि दुसऱ्या बाजूने किंमती कोसळलेल्या आहेत. त्यातच जागतिक व्यापार संस्थेचे आपण सदस्य झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात कृषी मालाच्या आयातीत वाढ झाली. त्यामुळे खर्च जास्त, मिळणारी किंमत कमी यामुळे संबंध आर्थिक व्यवहाराचे कोष्टक पार कोलमडले.

नवीन आर्थिक धोरणामुळे भारतातील कृषी व्यवस्थेला आणि ग्रामीण लोकांच्या जीवनाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे ग्रामीण

शेतकरी व जनतेला अत्यंत चिंता वाटत आहे. जागतिकीकरणामुळे भूमी, पाणी, जैविक विविधता इ. नैसर्गिक सामधनसामुग्रीच्या मालकी हक्कांच्या केंद्रीकरणावरील सर्व मर्यादा दूर करण्यात आल्यामुळे पर्यावरणाची सुरक्षितता धोक्यात आली आहे. बहुराष्ट्रीय व बहुउद्देशीय कंपन्या मोठ्याा प्रमाणावर ग्रामीण क्षेत्रावर विशेषतः शेती विभागावर आक्रमण करीत आहेत कारण या कंपन्यांना ग्रामीण शेतकऱ्यांकडून व त्यांच्या मालाच्या विपणनाबाबत अजिबात आस्था नाही.

लहान भूधारकांच्या दृष्टीने नवीन आर्थिक धोरण फायदेशीर सिद्ध झाले नाही. कारण अनुदानात करण्यात येणारी कपात, आयातीवर कमी केलेले निर्बंध यामुळे भारतासारख्या विकसनशील देशातील कृषी मालावरील उत्पादन खर्च वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला विकसित देशांनी अनुदान कपातीस नकार दिल्याने त्यांना कमी किंमतीस शेतमाल विकणे सहज शक्य होत आहे. पर्यायाने या स्पर्धेतून भारतीय शेतकरी बाहेर फेकला जात असल्याचे चित्र दिसून येते. परिणामी गेल्या पंधरा–विस वर्षात देशात एक लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या; अशी विदारक परिस्थिती असताना यावर्षी सुद्धा कापूस उत्पादकांना एकरी धोरण ठेऊन पॅकेजच्या रूपाने फक्त तात्कालिक साहाय्यक अनुदाने देऊन सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला नुसती पाने पुसली व मुळ बाजारव्यवस्था जशी आहे तशीच कायम ठेवली म्हणून यापुढे जर भारतीय शेती व शेतीशी निगडित उद्योगांना विदेशी स्पर्धेपासून संरक्षण मिळणार नसेल तर भारतातील ग्रामीण विभागातील शेती उत्पादने जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकू शकणार नाही.

वास्तविक भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. देशातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात असल्याने देशाची खूप मोठी श्रमशक्ती सुद्धा ग्रामीण विभागात आहे. कोणत्याही देशाच्या विकासासाठी मानवी साधनसंपत्ती, नैसर्गिक साधनसंपत्ती व तंत्रज्ञान या तीन महत्वाच्या बाबी आहेत. यापैकी भारतात श्रमशक्ती विपुल प्रमाणात आहेत. भारतात आज बहुसंख्य तरूण पिढी कृशी क्षेत्राकडे पाठ फिरवीत आहे. जागतिकीकरणाच्या, खाजगीकरणाच्या प्रभावाने शहरातील भोगवादी, चंगळवादी संस्कृतीचे आकर्शण मोठ्याा प्रमाणात वाढले असून खेडी ओस पडत चालली आहेत.

नव्या आर्थिक धोरणांचा पुरस्कार करीत असताना केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील आपला आर्थिक सहभाग कमी केल्यामुळे आर्थिक समस्या वाढल्या असून ग्रामीण क्षेत्रातील श्रमिक वर्ग त्रस्त झाला आहे. सार्वजनिक क्षेत्राचा विकास जवळजवळ ठप्प झाला आहे. अनेक ग्रामीण क्षेत्रातील उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. हजारो कामगार बेकारीच्या दरीत लोटले जात आहेत.

प्रो. पिगू यांच्या मते, "रोजगार नसलेल्या परंतु रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेकार म्हणता येईल." काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही एखाद्या व्यक्तीला ज्या अवस्थेत काम किंवा रोजगार मिळत नाही त्या विशिश्ट अवस्थेला बेकारी असे म्हणतात.[5] बहुराष्ट्रीय कंपन्या, गुंतवणूकदारांकडून कमीत कमी मनुष्यबळाचा वापर होत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहे; त्यामुळे ग्रामीण क्षेत्रात रोजगार मिळणे कठीण झाले आहे.

आजच्या अर्थकारणाचे दोन प्रमुख दुश्परिणाम झालेले दिसतात. पहिले म्हणजे मर्यादित कौशल्य असलेल्या बहुसंख्य रोजगारक्षम समाजासाठी आज रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत, त्यामुळे त्याला वैफल्याने ग्रासले आहे. दुसरे असे की ज्यांचे रोजगार टिकून आहेत; त्यांच्या मनात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना. जोपर्यंत सामान्य लोकांमध्ये असुरक्षिततेची भीती कायम राहील तोपर्यंत ग्रामीण जनता गतीमान होणार नाही.

जागतिकीकरण व उदारीकरणामुळे मोठ्याा व लघुउद्योजकांची स्थिती आगीतून फुफाट्याात अशी काहीशी झाली आहे. जीवघेण्या स्पर्धेमुळे बरेच उद्योग बंद पडले आहेत. काही उद्योग आजारी असून कसेबसे चालू आहेत; त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. एखादा अपवाद वगळता बहुतेक सरकारी सुतगिरण्या बंद आहेत. बहुतांश सरकारी साखर कारखाने आर्थिक कोंडीत सापडले आहेत; या सर्वांचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण स्तरावर झाला आहे.

एकंदरीत ही मुक्त अर्थव्यवस्था फार थोड्याा लोकांच्या फायद्याची असल्याने श्रमिक वर्ग, शेतमजूर, शेतकरी व सर्वसामान्य जनता यांना उद्ध्वस्त करणारी आहे. नोबेल पुरस्कार प्राप्त डॉ. अमर्त्य सेन यांनी सुद्धा भारतीय अर्थव्यवस्था चुकीच्या सिद्धांतावर आधारित आहे, असे म्हटले आहे. नव्या आर्थिक धोरणामुळे मोठ्याा उद्योगांना कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य आहे. साहजिकच लघुउद्योगाच्या क्षेत्रात मोठे उद्योग प्रवेश करीत आहेत ; त्यामुळे लघुउद्योग अडचणीत येण्याचा धोका निर्माण झाला आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे स्पर्धा वाढणार असून स्पर्धेत टिकण्यासाठी नवे तंत्रज्ञान वापरले जाते, हे तंत्रज्ञान श्रमाची बचत करणार आहे, त्यामुळे बेकारी वाढेल.[6]

उपाययोजना :

नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर ग्रामीण विभागावर आलेले संकट निवारण्यासाठी काही उपाय सूचविण्यात आलेले आहेत.

1.भारतात नवीन तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. त्याच्या आधारावर देशात बहुराष्ट्रीय कंपन्या जे उत्पादन करतात तेच उत्पादन देशी उत्पादकांनी केल्यास देशाच्या विकासात आणखी भर पडेल.
2.शेती क्षेत्रामध्ये ज्या अनेकाविध बी–बियाणे खते व किटकनाशके उत्पादन करणाऱ्या विदेशी कंपन्या आहेत त्यावर निर्बंध घालून जर देशी उत्पादकांनी हे उत्पादन केले तर शेती उत्पादनात वाढ होईल.
3.भारतात श्रमप्रधान उद्योग जे तुलनात्मकदृष्ट्याा स्वस्त व चांगले उत्पादन करू शकतात त्यांची निर्यात वाढवावी परंतु आयातीवर निर्बंध घालून ग्रामीण लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.
4.शेतीवर आधारित शेतमाल प्रक्रिया उद्योगासाठी सरकारी स्तरावरून आर्थिक अनुदान, सबसिडी दिली गेल्यास शेतकऱ्यांना एक आधार मिळेल.
5.ग्रामीण शेतकरी, शेतमजूर यांना अधिकाधिक उत्पादन करता येईल. या दृष्टीने नवीन तंत्रज्ञान विकसित करणे गरजेचे आहे.
6.ग्रामीण युवकांना माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान देण्यासाठी सरकारने पुढाकार घेतल्यास बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल.
7.बदलत्या काळानुसार ग्रामीण जनतेनी स्वतःची मानसिकता बदलविल्यास जीवन जगण्याची एक प्रेरणा मिळेल.

तळ टिपा :

1)Okum and Richardson, R.W., Studies in Economic Development. P. 230
2)William and Buttrik, Principles and Problems of Economic Development. P.7
3)डोळे, डॉ. ना. य., उदारीकरण : नवे आर्थिक धोरण (नागपूर : विद्या प्रकाशन, 1997) P. 8
4)Swamy, P.S., The World Book and the Globlisation of Indian Economic (New Delhi : Public Interest Research Group) P. 16

5)William Beveridge, Full Employment in Free society P. 18
6)ढमढेरे, डॉ. एस. व्ही., शिंदे, डॉ. एस. जी., भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास (पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, 2010) P. 78

संदर्भ ग्रंथ :

1)गंगवाल; सुभाश, नवीन आर्थिक धोरण नीती एवं नियोजन (जयपूर : मंगलदीप पब्लीकेशन्स, 2002.)
2)विमल जालान, 21वी सदी में भारतीय अर्थव्यवस्था (दिल्ली : प्रभात प्रकाशन, ैप्ट 9001रू2000)
3)जोशी, प्रा. एस. एस., भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल (पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, 2007)
4)साठे, डॉ. मधुसूदन., भारताच्या आर्थिक समस्या (पुणे : डायमंड पब्लिकेशन्स , 1991)
5)जोशी, श्रीनिवास, वेध जागतिकीरणाचा (नागपूर : साईनाथ प्रकाशन., फेब्रुवारी 2010)
6)देशमुख, डॉ. प्रभाकर, आर्थिक धोरण आणि नियोजन (नागपूर : पिंपळापुरे अँड कं. पब्लीशर्स , जुलै 1989)
7)साठे, डॉ. मधूसुदन दत्तात्रय; आर्थिक सुधारणा आणि वाढ (पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, 2008)

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net